# - बहि:शाल शिक्षण मंडळ -

**अ. प्रस्तावना :** विद्यापीठ केवळ परीक्षा घेण्याचे केंद्र होऊ नये तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासाला चालना देऊन भविष्यात उत्तम नागरिक तयार व्हावा असे अपेक्षित आहे. त्यासाठी शैक्षणिक कौशल्याबरोबरच क्रीडागुण, सांस्कृतिक कौशल्ये व सामाजिक बांधीलकीच्या माध्यामातुन अपेक्षित असणारे सामजिक कार्य यासाठी विविध उपक्रम वर्षभर राबविले जात असतात. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ हे विविध विद्याशाखांमधुन अध्यापन, परीक्षा व संशोधन या तिनही महत्वपूर्ण जबाबदाऱ्या निष्ठापूर्वक पार पाडीत आहे. या विद्यापीठातून शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी व संशोधक आपल्या चतुरस्त्र कामगिरीने महाराष्ट्राच्या व देशाच्या गौरवशाली परंपरेत वैविध्यपूर्ण कामगिरीचा ठसा उमटवीत आहेत व त्याद्वारे साहित्य, कला, क्रिडा, अभिनय यासारख्या शालाबाहय उपक्रमांमध्येही आपला नावलौकीक वाढवित आहेत ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. एकविसाव्या शतकात व प्रगतीच्या युगात सुध्दा देशातील सुशिक्षितांचे प्रमाण फक्त ५० % च्या आसपास आहे हेही दुदैवाने खरे आहे. त्यामुळेच औपचारीक शिक्षणापेक्षा अनौपचारीक शिक्षणाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे.

या वाटचालीत मैलाचा दगड ठरावा अशी ‘बहि:शाल शिक्षण मंडळ’ स्थापन करण्याची अभिनव योजना विद्यापीठाने लागु केली आहे. विविध साथीच्या रोगांचे नियंत्रण, जलस्वराज्य, ग्रामस्वच्छता या सारख्या योजना किंवा एच.आय.व्ही. / एड्स जनजागरुकता मोहिम यांना मिळणारा प्रतीसाद हा त्याचेच द्योतक आहे. त्यामुळेच ‘बहि:शाल शिक्षण मंडळा’च्या माध्यमातुन लोकशिक्षण, जनजागृती व स्थानिक प्रश्नांची उकल होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत. विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती व उपाययोजनांची चर्चा करावी व त्याचप्रमाणे पर्यावरण रक्षण, ग्रामस्वच्छता, स्त्री भृणहत्या, मुल्य शिक्षण, रोजगार व व्यवसाय मार्गदर्शन अशा जिव्हाळ्यांच्या विषयांवरही चर्चासत्रे आयोजीत करावे असे प्रस्तावित आहे.



**ब. बहि:शाल शिक्षण मंडळाचे गठण :** महाविद्यालयीन स्तरावर बहि:शाल शिक्षण मंडळाचे गठण खालील पद्धतीने करावे -

| | | |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य | - अध्यक्ष |
| २. | २ शिक्षक - त्यापैकी शक्यतो १ महिला शिक्षिका | - सदस्य |
| ३. | एक शिक्षकेतर कर्मचारी | - सदस्य |
| ४. | प्रथम व द्वितीय शैक्षणिक वर्षातील प्रत्येकी एक विद्यार्थी | - सदस्य |
| ५. | सांस्कृतिक कार्यात सहभागी तृतीय वर्षातील एक विद्यार्थीनी | - सदस्य |
| ६. | महाविद्यालय ग्रंथपाल / सहाय्यक ग्रंथपाल | - समन्वयक |
| ७. | महाविद्यालयातील सांस्कृतीक समन्वयक | - सदस्य सचिव |

**क. वैशिष्टे :**

१. संपूर्ण महाराष्ट्रभर कार्यक्षेत्र असलेल्या या विद्यापीठाचे बही:शाल शिक्षण मंडळ म्हणजे लोकशिक्षणाची राज्यव्यापी चळवळ होऊ शकेल.

२. महाविद्यालयीन स्तरांवर बहि:शाल शिक्षण मंडळाची स्थापना व त्यामुळे शिक्षणाचे विकेंद्रीकरण.

३. अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती व लोकशिक्षण करण्याचे प्रभावी माध्यम.

४. स्थानिक महाविद्यालयीन स्तरावरील मंडळाकडून स्थानिक प्रश्नांचा उहापोह व समस्या निवारण्यासाठी उपयोग होऊ शकेल.

५. विकासाच्या विविध मुदद्यांवर सामान्य जनतेचे उदबोधन व प्रबोधन तसेच त्यांचा सकारात्मक सहभाग.

६. शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थी, कामगार, शेतकरी, ग्रामीण व शहरी अशा विविध समाज घटकांसाठी गरजानुरुप कार्यक्रमांचे संयोजन.

७. बहि:शाल शिक्षण मंडळ स्थापन करण्यास इच्छूक महाविद्यालयाने नोंदणी फार्म भरुन विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर सदर महाविद्यालय अनुदान मिळणेस पात्र राहील.

**ड. कार्यप्रणाली :**

१. सदर बहि:शाल शिक्षण मंडळाच्या माध्यमातून व्याख्यानमाला, परीसंवाद चर्चासत्र किंवा शिबीर यांचे आयोजन करता येईल.

२. नोंदणी झालेल्या केंद्राने वर्षातून किमान एक - दोन दिवसांची व्याख्यानमाला व एक दिवसाचे शिबीर/परीसंवाद/चर्चासत्र आयोजित करणे बंधनकारक राहील.

३. महाविद्यालयास यापेक्षा जास्त कार्यक्रम राबवावयाचे असल्यास त्यास मुभा राहील मात्र अतिरिक्त कार्यक्रमासाठी आलेल्या खर्चाची मान्यता मिळणार नाही.

४. उपरोक्त उपक्रमांसाठी पुढील खर्चाची प्रतिपूर्ती विद्यापीठाकडून केली जाईल (कमाल रु. ८०००/- प्रति महाविद्यालय).

| क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| (अ) | **व्याख्यानमालेसाठी (२ दिवस)** | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु. ५०० x २) | रु. १०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवास खर्च (रु. ५०० x २) | रु. १०००/- |
| | ग. प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु. ५००/ - |
| | **प्रति व्याख्यान एकूण** | **रु. २५००/-** |
| (ब) | **परीसंवाद / शिबीर / चर्चासत्र (२५ व्यक्तींसाठी १ दिवस)** | |
| | क. वक्त्याचे मानधन (१००० X २ वक्ते) | रु. २०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवास खर्च (१००० X २ वक्ते) | रु. २०००/- |
| | ग. सहभागींचा चहापान व भोजन खर्च | रु. १०००/- |
| | घ. इतर प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु. ५००/- |
| | **एकूण** | **रु. ५५००/-** |
| | **एकुण (अ + ब)** | **रु. ८०००/-** |



५. कार्यक्रम / उपक्रम अनिवासी स्वरुपाचे असावे व त्यांचे स्वरुप दरवर्षी बदलते असले पाहीजे.

६. निर्धारीत शिर्षपेक्षा / अनुदानापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याची अदायगी होणार नाही व संबधीत खर्च संस्थेला /महाविद्यालयाला सोसावा लागेल.

७. चर्चासत्र / परीसंवाद / शिबीरात / व्याख्यानमालेत विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी विषयांची यादी सोबत जोडली आहे. त्यासाठी तज्ञ व्याख्याता / मार्गदर्शकांना आमंत्रीत करावे. सदर यादीच्या बाहेरच्या विषयांवर व्याख्यान / परीसंवाद / चर्चासत्र / शिबीर आयोजित करावयाचे असल्यास या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे आश्यक राहील.

८. बहि:शाल शिक्षण मंडळाच्या उपरोक्त उपक्रमांसाठी अदा केले जाणारे अनुदान प्रतीपूर्ती स्वरुपाचे असल्यामुळे प्रथम कार्यक्रम / उपक्रम आयोजित करावा व तदनंतर कार्यक्रमांचा अहवाल, फोटोग्राफस, वृत्तपत्र कात्रणे व खर्चाची देयके विद्यापीठास सादर करावी.

९. कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन, अतिथीचे स्वागत किंवा शिबीरार्थीची चहापान व भोजन व्यवस्था यामध्ये भपकेबाजपणा असु नये. साध्या व सोप्या पध्दतीने परंतु स्वच्छ व निटनेटकी व्यवस्था अपेक्षित आहे.

१०. व्याख्यानमाला / परीसंवाद /चर्चासत्र /शिबीर या उपक्रमांच्या स्थळी व्यासपीठावर / मंडपात. **''सदर व्याख्यानमाला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत बही:शाल शिक्षण मंडळाच्या विद्यमाने आयोजित केलेली आहे''** असे दर्शवणारा कापडी / फ्लेक्स बॅनर असणे आवश्यक आहे. (नमुना सोबत जोडला आहे).

११. व्याख्यात्यांना / वक्त्यांना दयावयाच्या आमंत्रणामध्ये त्यांना अदा करण्यात येणारे मानधन व प्रवास खर्चाबाबत तसेच त्यासाठी प्रवासाचे मुळ देयक सादर करणे आवश्यक आहे असा स्पष्ट उल्लेख असावा.

१२. कार्यक्रम झाल्यानंतर महाविद्यालयीन बहि:शाल शिक्षण मंडळाचे समन्वयक / सदस्य सचिव यांनी सर्व खर्चाची बिले क्रमवार लाऊन त्याची संक्षीप्त यादी / विवरणपत्र तयार करुन त्यावर अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या जोडसहीने विद्यापीठास सादर करावी.

**इ. एखाद्या संस्थेला बहि:शाल शिक्षण केंद्र म्हणून मान्यता देण्यासंबंधी :**

१. बहि:शाल शिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी मा. अध्यक्ष, बहि:शाल शिक्षण मंडळ यांच्या नावे विनंती अर्ज.

२. संस्थेचे नाव, पत्ता व दूरध्वनी नंबर.

३. संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

४. संस्थेच्या स्थानिक व्यवस्थापन समितीची यादी.

५. मागील २-३ वर्षात संस्थेने राबविलेल्या उपक्रमांची माहिती, वृत्तपत्रांतील बातम्या, छायाचित्रे इ.

६. मागील दोन वर्षाचे ताळेबंद / लेखा परीक्षकाचा अहवाल.

७. संपर्क प्रतिनिधीचे नाव, पत्ता, दुरध्वनी, मोबाईल इ, तपशिल.

**फ. बहि:शाल शिक्षण मंडळातर्फे राबविता येऊ शकणारी शिबीरे :**

१. स्वयंरोजगार शिबीर

२. उद्योजकता विकास शिबीर

३. पथनाटय शिबीर

४. ग्रामीण महिलांचे शिबीर

५. ग्रामीण युवक दशा व दिशा शिबीर

६. ग्रामीण कलावंतांचे शिबीर

७. ऐतिहासिक व्यक्तिंच्या चरित्रातून विकासाची दिशा.

८. एड्स आणि प्रबोधन.

९. माहितीचा अधिकार कशासाठी ?

१०. ग्रामीण आरोग्य आणि स्वच्छता

११. रक्तदानाचे महत्व

१२. झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांच्या समस्या

१३. महिला सबलीकरण



१४. स्थानिक साधनसामुग्री व्यवस्थापन

१५. वक्तृत्व आणि संभाषण कौशल्य शिबीर

१६. पथनाटयातून व्यक्तिमत्व विकास

१७. ऐतिहासिक स्थळांना भेटी

१८. छंद जोपासना शिबीर

१९. ऐतिहासिक व्यक्तींचे चरित्र

२०. शिक्षणाच्या नव्या वाटा, नव्या दिशा

२१. आकाश दर्शन शिबीर

२२. मुल्यशिक्षण व साहित्य

**फ. बहि:शाल शिक्षण केंद्रासाठी सुचना :** बहि:शाल शिक्षण ही एक अनौपचारिक शिक्षणाची चळवळ असून स्वयंप्रेरणेतून समाजसेवा करण्याची संधी आहे. त्यामुळे कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त कार्यक्रम, (खर्चात काटकसर) या बाबीवर भर आहे. तरी खालील बाबी कटाक्षाने पाळून सहकार्य करावे ही विनंती.

१. विद्यापीठाने परिपत्रकात नमुद केल्याप्रमाणे संस्थेने दोन्ही कार्यक्रम (व्याख्यानमाला व शिबीर) घेणे आवश्यक आहे.

२. परिपत्रकात नमुद कार्यक्रमांसाठी संस्थेने खर्च करायचा असून विहीत तरतुदीच्या रक्कमेपर्यंतचा परतावा विद्यापीठ करेल मात्र त्यासाठी व्हॉचर्सची पूर्तता करणे आवश्यक आहे. खर्चाची विगतवारी देतांना कार्यक्रम निहाय देण्यात यावी. त्यात **शिर्षानिहाय** खर्च दर्शविण्यात यावा व त्यासाठी करण्यात आलेल्या प्रत्यक्ष खर्चाची बिले जोडण्यात यावीत.

३. वक्त्यांचे प्रवास भाडे हे जवळच्या मार्गाने होणारे प्रत्यक्ष प्रवास भाडे असेल. त्यात फक्त एस.टी./रेल्वे द्वितीय श्रेणीचे प्रत्यक्ष प्रवास भाडे देण्यात येईल. कारने प्रवास केला असला तरी उपरोक्तप्रमाणेच कमाल देय रक्कम ग्राहय धरण्यात येईल. तरी संस्थेने प्रवास भाड्याची अदायगी करतांना दक्षता घ्यावी.

४. वक्त्यांचे मानधन हे कार्यक्रमनिहाय सिमीत रकमे इतकेच देण्यात यावे. विद्यापीठाने कार्यक्रमनिहाय नमुद केल्यापेक्षा जास्त वक्त्यांना तसेच विहीत रक्कमेपेक्षा जास्त मानधन संस्थांनी दिल्यास त्याचा भार संस्थेस सोसावा लागेल.

५. विद्यापीठाने विहीत केलेल्या तरतूदीपेक्षा जास्त रक्कम खर्च केल्यास त्याची प्रतीपुर्ती होणार नाही.

६. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी खर्च करण्यात आलेल्या रकमेपोटी बिल घ्यावे व त्यासोबत व्हॉचर जोडून केंद्राचे नाव, दिनांक व तपशिल नमुद करावा व रक्कम अक्षरी व अंकी लिहिलेली असावी.

७. ज्या वस्तूंच्या बाबतीत बिल मिळाले नसेल केवळ त्याच ठिकाणी संस्थेच्या व्हॉचरवर तपशिल लिहून माल पुरविणाऱ्याची सही घ्यावी व इतर तपशिलही त्यावर असावा.

८. संस्थेने घेतलेल्या सर्व कार्यक्रमांची सर्व बिले एकाच टपालाने, स्पष्टपणे विगतवारीसह **कार्यक्रम संपल्यानंतर १५ दिवसांच्या आत** विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे.

९. संस्थेकडून कार्यक्रमांची देयके अशंत: विभागून न पाठविता एकाच वेळी पाठवावीत. एकाच कार्यक्रमांची दोनदा बीले स्वतंत्र पाठविल्यास ती स्विकारली जाणार नाहीत.

१०. बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेतील अनुदानाची रक्कम कुठल्याही परिस्थितीत चालु शैक्षणीक वर्षात (३० जुन पूर्वी) खर्च करणे व त्याचे हिशोब व उपयोगिता प्रमाणपत्र सर्व मुळ बिलांसह **१५ जुलै पर्यंत** विद्यापीठास सादर करावे. आपली देयके व हिशेब विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर रक्कम आपल्या खाती नावे दाखविण्यात येईल व पुढील वर्षाचे अनुदान देण्यात येणार नाही याचीकृपया नोंद घ्यावी.



**म. महाविद्यालयाने अनुदानाच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी खाली नमुद केलेप्रमाणे कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन विद्यापीठाकडे सादर करावी.**

१. कार्यक्रमाचा अहवाल, फोटोग्राफ, वृत्तपत्रांची कात्रणे.

२. व्याख्यातांना / वक्त्यांना अदा करण्यात आलेले मानधन व प्रवास खर्चांचे मुळ व्हॉचर्स.

३. कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष झालेल्या इतर प्रशासकीय खर्चांची मुळ बिले.

४. सनदी लेखापालाकडुन लेखापरीक्षण केलेला अनुदान रक्कमेचा जमा-खर्च / हिशेबाचे पत्रक. (सोबत जोडलेलया नमुन्यातील लेखाशिर्ष व कमाल खर्च मर्यादा याची नोंद घेवुन जमा-खर्च तयार करावा.)

५. सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्र. (Utilization Certificate)

**टीप :** बहि:शाल शिक्षण मंडळ योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास, अनुदानाची रक्कम **''कुलसचिव - महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक''** यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाद्वारे (Demand Draft) विद्यापीठास तात्काळ परत करावा.

**ह. बहि:शाल शिक्षण मंडळातर्फे आयोजित व्याख्यानमालेसाठी प्रस्तावित विषयांची यादी -**

**सामाजिक :**

१. टी. व्ही / इंटरनेटचा मुलांवर होणारा परिणाम.

२. लोकसंख्या शिक्षण - काळाची गरज.

३. किशोरवयीन समस्या आणि मार्गदर्शनाची गरज.

४. एड्स आणि भयानकता.

५. आजची शिक्षण पद्धती - गुणदोष.

६. लोक साहित्य, संस्कृती व कलांचे जतन.

७. जाहीरात : विक्रयकलेचे प्रभावी माध्यम.

८. व्यसनमुक्ती.

९. सामाजिक प्रबोधन.
१०. युवकांच्या सामाजिक जबाबदाऱ्या.
११. आदिवासींच्या समस्या व उपाय.
१२. व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध पैलू.
१३. सामाजिक अधोगती : एक कारणमिमांसा.
१४. चित्रपट आणि समाजजीवन.
१५. जागतिक शांतता व भारताची भूमिका.
१६. संत साहित्य व त्याचा लोक शिक्षणातील सहभाग.
१७. परिवर्तनाच्या उंबरठ्यावर भारत.
१८. पालकत्व : एक जबाबदारी.
१९. आजचा युवक व चित्रपट.
२०. लोकसंख्या आणि विकास शिक्षण.
२१. तुमच्या मुलांनी करावे काय ?
२२. ग्रामिण विकासाचे पैलू.
२३. वृक्षारोपण व जंगल संवर्धन.
२४. कुपोषण समस्या व निवारण.
२५. ग्रामिण आरोग्य जनजागरुकता.
२६. ग्रामिण शेतकऱ्यांच्या आत्महत्या.
२७. स्त्रीभृण हत्या - दुरगामी सामाजिक परिणाम.
२८. तंटामुक्त गांव.
२९. आजची युवा पिढी - समस्या आणि उपाय.
३०. मानव आणि पर्यावरण.

## नोकरी व्यवसायाच्या वाटा :

१. स्वयंरोजगार संधी व आजचा युवक.
२. नोकरी व्यवसायाच्या संधी.
३. विविध शासकीय योजना व स्वयंरोजगार.



४. यशस्वी विक्रेता कसे व्हाल ?
५. यशस्वी उद्योजक कसे व्हाल ?
६. ग्रामीण उद्योजक कसे व्हाल ?
७. उत्पन्न वाढीसाठी तंत्र व मंत्र.
८. यशाचा महामार्ग.
९. मुलाखतीचे तंत्र व मंत्र.
१०. चौकटी बाहेरच्या संधी.

## शेती :

१. शेती : आजची परिस्थिती.
२. नैसर्गिक शेती.
३. शेतीतील माझे प्रयोग.
४. शेती व मृदसंधारण / जमीनीचा कस टिकविणे.
५. रासायनिक खते, औषधांचा वापर व परिणाम.
६. शेती व शेतमालावरील प्रक्रिया व विपणन.
७. फलोत्पादन.
८. आधुनिक तंत्रज्ञान व शेती.
९. जलसंधारण - पाणी आडवा आणि जिरवा.
१०. शेती व ठिंबक सिंचन.
११. पशुशेती.
१२. पाण्याचे नियोजन.
१३. बांबू शेती गरज व महत्व / वनशेती.
१४. जैविक खतांचा शेतीत वापर.
१५. दुहेरी पिक लागवड - फायदे व तोटे.
१६. कोरडवाहू शेती - समस्या व उपाय.
१७. पडीक जमीन व विकार.
१८. वनसंपत्ती, सामाजिक वनीकरण आणि निसर्ग संतुलन.

१९. वनौषधी.

२०. शेती व पूरक व्यवसाय.

२१. कृषी विज्ञान मंडळाची गरज.

२२. धान्य साठवण्याच्या पद्धती.

२३. बी-बियाणे खरेदी करतांना घ्यावयाची काळजी.

२४. शेती व अपघात.

२५. नवी - जुनी अवजारांची ओळख.

## महिला समस्या :

१. ग्रामीण महिलांच्या समस्या व उपाय.

२. ग्रामीण महिला व स्वयंरोजगाराच्या संधी.

३. स्त्री कामगारांचे प्रश्न.

४. महिला व बालसंगोपनाची जबाबदारी.

५. महिला सबलीकरण कश्यासाठी ?

६. ग्रामीण स्त्री - दशा व दिशा.

७. महिला बचतगट - एक चळवळ.

८. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांचा सहभाग.

९. महिला व कायदे.

१०. आईचे वाचन आणि बालकांचे व्यक्तीमत्व.

११. हुंडाबळी.

## ग्रामीण विकास :

१. आदर्श गाव - एक संकल्पना.

२. गावाचे आरोग्य - गावकऱ्यांचे भाग्य.

३. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकारी संस्थाचे स्थान.



४. ग्रामीण विकासाची नवी नीती - आधुनिकता.

५. ग्रामीण जीवनातील स्वच्छतेचे महत्व.

६. ग्रामोद्धाराकरीता वैज्ञानिक दृष्टीकोन.

७. ग्रामीण जीवनातील क्रीडा / मनोरंजनाचे उपक्रम.

८. एकत्र कुटूंब पद्धतीचे फायदे.

९. ग्रामिण विकास व तंत्रज्ञान.

१०. अंधश्रद्धा निर्मुलन.

## आरोग्य :

१. कौटुंबिक गरजा आणि आरोग्य.

२. नेहमी उद्‌भवणाऱ्या आजारांची माहिती व उपाय.

३. निसर्गोपचार व आयुर्वेदाचे महत्त्व.

४. बालसंगोपन व बाल आरोग्य.

५. आरोग्य आणि योगाभ्यास.

६. स्त्रियांचे आरोग्य व आजाराचे स्वरुप.

७. सकस व चौरस आहार.

८. रोग निवारणाचे स्वस्त व सोपे आयुर्वेदिक उपाय.

९. प्रथमोपचार.

१०. विषबाधा.

११. कुटूंबनियोजन.

१२. वृद्धांचे आरोग्य व उद्‌भवणाऱ्या तक्रारी.

१३. मानसिक आरोग्य.

१४. आरोग्य कसे राखाल ?

१५. मुले / मुली वयात येतांना.

## अर्थ व बँका :

१. बचतीच्या योजना व फायदे.
२. पर्यावरण व आर्थिक विकास.
३. बहूराष्ट्रीय कंपन्या व त्याचे परिणाम.
४. शेती विकासाचे अर्थशास्त्र.
५. ग्रामीण कुटूंबाचे अर्थनियोजन.
६. ग्रामीण पतपुरवठा.
७. कर्ज वापराचे नियोजन.
८. विमा हवा की नको.
९. घर खर्चाचे नियोजन - कुटूंबाचा अर्थसंकल्प.
१०. एम. एल. एम. कंपन्यांचा भुलभुलैया.

## विज्ञान व तंत्रज्ञान :

१. विज्ञान व तंत्रज्ञान आणि सामाजिक क्रांती.
२. वैज्ञानिक दृष्टीकोन कशासाठी.
३. प्रदूषण - हवा / पाणी / अन्न.
४. अंधाराकडून प्रकाशाकडे (अंधश्रद्धा निर्मुलन)
५. खेळता खेळता विज्ञान शिका.
६. स्त्री व विज्ञान.
७. संगणकाची गरज व माहितीचे युग.
८. विज्ञानाचे आधुनिक अविष्कार.
९. धर्म आणि विज्ञान.
१०. उर्जेचे पारंपरिक व अपारंपरिक स्त्रोत.
११. विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टीकोन.
१२. सृष्टी चमत्काराचे विज्ञान.
१३. फलज्योतिष्य शास्त्र - एक थोतांड.
१४. आपले सण, व्रत, वैकल्य आणि विज्ञान, अपव्यय.
१५. सौर उर्जा.



## शिक्षण :

१. भावी जीवनाच्या उंबरठ्यावर.
२. स्पर्धा परिक्षांची तयारी व युवकांची मानसिकता.
३. शिक्षण - समाजसुधारणेचे साधन.
४. ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रश्न.
५. आदिवासी शिक्षण समस्या.
६. शिक्षणाने माणूस घडतो का ?
७. आजचा विद्यार्थी व संस्कार.
८. स्पर्धा परिक्षा आणि महाराष्ट्रीयन युवक.
९. उच्च शिक्षणाच्या वाटा (१० वी व १२ वी नंतर)
१०. अनौपचारीक शिक्षण.
११. शालेय विद्यार्थी व विकासाचे विविध उपक्रम.
१२. निरंतर शिक्षण.
१३. शिक्षण आणि संस्कार.
१४. शिक्षण व अपेक्षा.
१५. प्रौढ शिक्षण.
१६. स्त्रिया व उच्चशिक्षण.

❋ ❋ ❋ ❋ ❋

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## बहि:शाल शिक्षण मंडळ योजना

## प्राचार्यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

## - अ -

प्रति,
**मा. संचालक - विद्यार्थी कल्याण,**
बहि:शाल शिक्षण मंडळ,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

महोदय / महोदया,

आपल्या विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेत आम्ही सहभागी होण्यास इच्छूक असून कृपया या योजनेत सहभागी करुन घ्यावे ही नम्र विनंती. आमच्या महाविद्यालयाची सविस्तर माहिती सोबत देत आहे.

सदर योजने अंतर्गत आम्हाला अनुदान मंजुर झाल्यास योजनेच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास आमची तयारी आहे. त्याचप्रमाणे योजनेसाठी आलेल्या खर्चाचा ताळेबंद, लेखा परिक्षण अहवाल व कार्यक्रमाचा वृत्तात विद्यापीठास वेळोवेळी विहीत मुदतीत पाठविण्यात येईल असे लिहून देतो.

आपला

**अधिष्ठाता / प्राचार्य**

College Seal

**संपर्क प्रतिनिधीचे नाव व सही** **महाविद्यालयाचा शिक्का**



# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## बहि:शाल शिक्षण मंडळ योजना - प्राचार्यांनी द्यावयाची माहिती

## - ब -

| | |
|---|---|
| महाविद्यालयाचे नाव | |
| महाविद्यालयाचा पत्ता | |
| प्राचार्यांचे नाव व दुरध्वनी क्रमांक | |
| संपर्क प्रतिनिधीचे नाव व पत्ता | |
| दुरध्वनी क्रमांक (एस.टी.डी कोडसह) | |
| कार्यालय दुरध्वनी व मोबाईल नंबर | |
| संस्थेचा नोंदणी क्र. | |
| स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्यांची नावे | १. |
| | २. |
| | ३. |
| | ४. |
| | ५. |
| | ६. |
| | ७. |
| मागील दोन वर्षाचे ताळेबंद / लेखा परिक्षण अहवाल जोडला : आहे / नाही. | |
| मागील दोन / तीन वर्षामध्ये संस्थेने राबविलेल्या उपक्रमांची माहिती वृत्तपत्रातील कात्रणे / छायाचित्रे इ. (स्वतंत्रपणे जोडावी). | |

**संपर्क प्रतिनिधीची सही व नाव** **अधिष्ठाता / प्राचार्य**

College Seal

**महाविद्यालयाचा शिक्का**

## बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी जमा - खर्चाचा नमुना.

| क्र. | जमा | रक्कम | क्र. | खर्च | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | **विद्यापीठ अनुदान** | | **अ.** | **व्याख्यानमाला** | |
| | | | १. | मानधन | |
| | | | | १. श्री. | |
| | | | | २. श्री. | |
| | | | २. | प्रवासखर्च | |
| | | | | १. श्री. | |
| | | | | २. श्री. | |
| | | | ३. | प्रशासकीय खर्च | |
| | | | | १. | |
| | | | | २. | |
| | | | | ३. | |
| | | | **ब.** | **परीसंवाद / चर्चासत्र / शिबीर** | |
| | | | १. | मानधन | |
| | | | | १. श्री. | |
| | | | | २. श्री. | |
| | | | २. | प्रवासखर्च | |
| | | | | १. श्री. | |
| | | | | २. श्री. | |
| | | | ३. | चहापान व भोजन खर्च | |
| | | | | १. | |
| | | | | २. | |
| | | | | ३. | |
| | | | ४. | प्रशासकीय खर्च | |
| | | | | १. | |
| | | | | २. | |
| | | | | ३. | |
| | **एकुण जमा** | | | **एकुण खर्च** | |

**समन्वयक तथा सचिव**

**अध्यक्ष तथा प्राचार्य**
(सही व शिक्का)

**सनदी लेखापाल**
(सही व शिक्का)



**(बॅनरचा नमुना)**

